11 MAR 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुस्ती संकुल, संग्रहालयासाठी तरतूद

## शिवाजी विद्यापीठाच्या अंदाजपत्रकाला अधिसभेची मंजुरी : साडेपाच कोटींचे तुटीचे अंदाजपत्रक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२२-२३ चे सुधारित आणि सन २०२३-२०२४ चे ५.३० कोटींचे तुटीचे अंदाजपत्रक शुक्रवारी अधिसभेत मंजूर करण्यात आले. या अंदाजपत्रकात कुस्तीसंकुलासाठी ५० लाख, इन्सेंटिव्हज फॉर पब्लिकेशन्स ॲण्ड ॲवार्डसाठी ५ लाख, हेल्थ कार्ड ऑटोमेशन सॉफ्टवेअरसाठी १० लाख, इनहेन्समेंट कम्युनिकेशन्स स्कीलच्या लघुकालावधीच्या परिषदेसाठी १० लाख, पोस्ट डॉक्टरल फेलोशिपसाठी ४० लाख आणि फुटबॉलसाठी तांत्रिकदृष्टया सुसज्ज मैदानातील पायाभूत विकासासाठी १० लाख रुपयांची तरतूद केली आहे. सौर यंत्रणा, अंतर्गत रस्ते, संग्रहालय, युवा वसतीगृह यासाठीही या अंदाजपत्रकात विशेष तरतूद केली आंहे.

या अंदाजपत्रकास वित्त व लेखा व समितीच्या बैठकीतील ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केली होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाची एकूण अपेक्षित जमा ५३२.९९ कोटी रुपयांची असून अपेक्षित खर्च ५३८.२९ कोटी रुपयांचा आहे. अंदाजपत्रकीय तूट ५.३० कोटी रुपयांची आहे. ती विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून भरून काढण्यात येणार आहे. मसुदा तयार करण्यासाठी राज्यशास्त्र विभागाचे डॉ. पी. आर.पवार, इंग्रजीचे डॉ. ए. एम. सरवदे, संख्याशास्त्रचे डॉ. एस. बी. महाडीक यांची समिती नियुक्त केली होती.

प्रशासकीय विभागांकडून ३७.१४ कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ४.८५ कोटी, इतर अधिविभागांकडून २.४७ कोटी जमा होण्याची अपेक्षा असून, इतर उपक्रमांमधून २५.२८ कोटी असे एकूण ६९.७४ कोटी विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२५.३० कोटी, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी १८.३७ कोटी अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३२.१० कोटी इतकी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १२.०१ कोटी इतकी रक्कम जमेकरिता प्रस्तावित केलेली आहे. निलंबन लेख्यांमधून २७५.४७ कोटी असे एकूण ५३२.९९ कोटी जमा होणे अपेक्षित आहे. खर्चाकरिता प्रशासकीय विभागाकडून ५८.४०, शास्त्र अधिविभागाकडून ७.५९, इतर अधिविभागाकडून ६.२६ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रमासाठी ४७.७३ कोटी असा विद्यापीठाच्या स्वनिधीमधील ११९.९८ कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १३२.०८, तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी ६.१३ तसेच संशोधन व विकास निधी ३२.१० कोटी; तसेच घसारा निधी १२.०१ कोटी, निलंबन लेखे २३५.९९ कोटी अशी एकूण ५३८.२९ कोटी खर्चासाठी तरतूद प्रस्तावित आहे.



### स्थगन प्रस्ताव फेटाळला

शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनाने वार्षिक अहवाल, विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा अहवाल न देणे, सुट्टीच्यादिवशी आलेल्या प्रश्नांना गैरहेतूने अग्रस्थान देणे, अद्ययावत परिनियम पुस्तक मागणी करूनही न देण्याविषयी सदस्य अभिषेक मिठारी यांच्यासह २५ सदस्यांनी स्थगन प्रस्ताव आणला होता. तो सभेचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. शिर्के यांनी फेटाळला. यावरील चर्चेची मागणीही फेटाळल्याने गोंधळ झाला.

### बैठक चालली तब्बल दहा तास

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक तब्बल दहा तास चालली. सकाळी १२ वाजता सुरू झालेली ही बैठक रात्री १० वाजता संपली. या बैठकीमध्ये एकूण ६६ ठराव मांडण्यात आले, त्यापैकी ६२ ठराव मागे घेण्यात आले, तर ४ ठराव मंजूर करण्यात आले. त्याखेरीज सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे, ताळंब्दपत्रक व लेखा परीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मंजूर करण्यात आला. सन २०२१-२२ साठीचा क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल व विद्यार्थी विकास मंडळाचा अहवालही मंजूर करण्यात आला.

### अभाविपच्या कार्यकर्त्यांनी अधिसभेत घुसून घातला गोंधळ; कुलगुरुंकडून कानउघाडणी

शिवाजी विद्यापीठात अधिसभा सुरु असताना शुक्रवारी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते घुसले आणि घोषणाबाजी करत महाविद्यालयीन निवडणुका झाल्याच पाहिजेत या मागणीसाठी सभागृहात बैठक मारून गोंधळ घातला. सुमारे २० मिनिटे हा गोंधळ सुरू होता. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के त्यांची चांगलीच कानउघाडणी करून सभागृहात याबद्दल चर्चा करता येणार नाही, असे बजावले व १६ मार्चला चर्चेचे निमंत्रण दिले.

### प्रश्नोत्तराच्या तासात सहा विषयांवरच चर्चा

प्रश्नोत्तराच्या तासातील १५ विषयांपैकी फक्त सहाच विषयांवर चर्चा झाली. डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. शिवाजी बोथीकर, अमरसिंग रजपूत, डॉ. दत्तात्रय पाटील, अभिषेक मिठारी, स्वागत परुळेकर, श्वेता परुळेकर, डॉ. निवासराव वरेकर, अमित जाधव, डॉ. मनोजकुमार पाटील, डॉ. मनोज गुजर यांनी उपप्रश्न विचारले होते. यामध्ये विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे शिक्षकांच्या ६१ तक्रारी, संशोधन मार्गदर्शकांना मानधन, ऑनलाईन परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांवरील दंडात्मक कारवाई, प्रशासकीय कर्मचाऱ्यांची मंजूर पदे, गेस्ट हाऊसमध्ये पाणी नसणे व इतर विषय चर्चेला आले. सदस्यांनी अनेक मुद्द्यांवरून विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले होते. अंदाजपत्रक सदस्य प्रा. डॉ. आर. जी. ढमकले यांनी मांडले. प्रकुलगुरु डॉ. पी. एस. पाटील आणि प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनीही अनेक प्रश्नांना उत्तरे दिली.

### ठळक वैशिष्ट्ये

▪ ग्रंथालयासाठी ऑनलाईन बुक्स आणि जर्नल्स खरेदी (२.८५ कोटी) ▪ विद्यार्थिनी वसतिगृह (२.५४ कोटी) ▪ विद्यार्थी वसतिगृह (२.६७ कोटी) ▪ कमवा व शिका मुलींचे वसतिगृहातील सोयीसुविधा (३८.०२ लाख) ▪ परदेशी ४० विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा (४७.०६ लाख) ▪ रिसर्च स्कॉलर वसतिगृह (६५ लाख) ▪ मेरिट स्कॉलरशिप (६० लाख) ▪ दिव्यांगांच्या सुविधाकरिता (२.२५ कोटी) ▪ संगणक प्रणाली (१ कोटी) ▪ रिसर्च स्कीम (२.२५ कोटी) ▪ विविध उपकरणे खरेदी (५.८६ कोटी) ▪ विद्यापीठ परिसरातील रस्ते (घसारा निधीतून १.५० कोटी) ▪ विद्यापीठ परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीने कुंपण (५० लाख) ▪ विद्यापीठ परिसर सुशोभीकरण (४० लाख) ▪ नवीन रेकॉर्ड रूम (५० लाख) ▪ रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटच्या प्रस्तावित इमारत (२५ लाख) ▪ प्रस्तावित इन्डोअर स्पोर्टस कॉम्प्लेक्स (१ कोटी) ▪ प्रस्तावित नवीन अकॅडेमिक कॉम्प्लेक्स (२५ लाख) ▪ नवीन सौर यंत्रणा (३ कोटी) प्रस्तावित वाणिज्य व व्यवस्थापन विभागाची इमारत (२ कोटी) ▪ म्युझियम कॉम्प्लेक्स (८५ लाख) ▪ विद्यार्थी कल्याण व युवा वसतिगृह (२ कोटी) ▪ वसतिगृहातील फायर सेफ्टी (५० लाख) ▪ क्रीडा विभाग वसतिगृह (२ कोटी) ▪ संगणकशास्त्र इमारतीच्या विस्तारीकरण (१ कोटी).

11 MAR 2023
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अर्थसंकल्पात शैक्षणिक, संशोधनासाठी भरीव तरतूद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५३८.२९ कोटी रुपयांचा २०२३-२४ चा वार्षिक अर्थसंकल्प अधिसभेत सदस्यांनी एकमताने मंजूर केला. यामध्ये शैक्षणिक व संशोधनासाठी कोट्यवधी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली. अंदाजपत्रकात अपेक्षित जमा ५३२.९९ कोटी असून, ५.३० कोटी रुपयांची तूट आहे. ती विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा व विद्यापीठ लेखा संहितामधील तरतुदीनुसार विद्यापीठाचे २०२२-२३ चे सुधारित अंदाजपत्रक व २०२३-२४ वार्षिक अंदाजपत्रक गुरुवारी अधिसभेत प्रा. रघुनाथ ढमकले यांनी पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे सादर केले. विद्यापीठाचे अंदाजपत्रक पाच विभागांत विभागलेले आहे. चालू वर्षात प्रशासकीय विभागांकडून ३७.१४ कोटी, शास्त्र अधिविभागांकडून ४.८५ कोटी, इतर अधिविभागांकडून २.२७ कोटी जमा होण्याची अपेक्षा आहे. इतर उपक्रमांमधून २५.२८ कोटी असे ६९.७४ कोटी विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२५.३० कोटी, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी १८.३७ कोटी जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३२.१० कोटी रुपये व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १२ कोटी रुपये रक्कम जमेकरिता प्रस्तावित केली आहे. निलंबन लेख्यांमधून २७५.४७ कोटी असे ५३२.९९ कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

अंदाजपत्रकात प्रशासकीय विभाग ५८.४० कोटी, शास्त्र अधिविभाग ७.५९ कोटी, इतर अधिविभाग ६.२६ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४७.७३ कोटी, असा विद्यापीठाच्या स्वनिधीमधील ११९.९८ कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १३२.०८ कोटी, तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी ६.१३ कोटी, संशोधन व विकास निधी ३२.१० कोटी व घसारा निधी १२.०१ कोटी, निलंबन लेखे २३५.९९ कोटी, अशी ५३८.९९ कोटी खर्चासाठी तरतूद प्रस्तावित केली आहे.

विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक्स अँड जर्नल्स खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २.८५ कोटींची तरतूद केली आहे. विद्यार्थिनी वसतिगृहाकरिता २.५४ कोटी, तर विद्यार्थी वसतिगृहाकरिता २.६७ कोटींची तरतूद केली आहे. 'कमवा व शिका' मुलींचे वसतिगृह नव्याने बांधले असून, त्यामध्ये सोयीसुविधा व दैनंदिन खर्चासाठी ३८ लाखांची तरतूद केली आहे. विद्यापीठातील ४० परदेशी विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधाकरिता ४७ लाखांची तरतूद केली आहे. रिसर्च स्कॉलर होस्टेल पूर्णत्वाकडे असून प्रलंबित कामासाठी ६५ लाखांची तरतूद केली आहे. विद्यापीठाने विविध स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरांत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी १० लाखांची तरतूद केली आहे. मेरीट स्कॉलरशिपकरिता ६० लाख रुपये, दिव्यांगांसाठी २.२५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी १ कोटी, संशोधनास चालना देण्याकरिता रिसर्च स्कीमकरिता २.२५ कोटींची तरतूद केली आहे.

## अधिसभेत ६२ ठराव मागे; ४ मंजूर

अधिसभा बैठकीत एकूण ६६ ठराव मांडण्यात आले. त्यापैकी ६२ ठराव मागे घेण्यात आले. तर ४ ठराव मंजूर करण्यात आले. त्याशिवाय २०२१-२२ चे वार्षिक लेखे, ताळेबंद पत्रक व लेखापरीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मंजूर करण्यात आला. २०२१-२२ साठीचा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल व विद्यार्थी विकास मंडळाचा अहवालदेखील मंजूर करण्यात आला.

## डॉ. ग. गो. जाधव अध्यासनासाठी ६३ लाखांची तरतूद

शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे. अध्यासन केंद्रातील नवीन फर्निचर, इलेक्ट्रिकल व बांधकामाकरिता ६३ लाख रुपयांची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे.

11 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाला शिवाजी विद्यापीठाचे आर्थिक बळ

## अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर, शैक्षणिक वर्षासाठी ५३८ कोटी रुपयांची तरतूद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ व विद्यापीठ लेखासंहितेमधील तरतुदीनुसार सन २०२२-२३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२३-२०२४ वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्यात आले. व्यवस्थापन परिषदेने अंदाजपत्रकाची अधिसभेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे. त्यानुसार हे अंदाजपत्रक अधिसभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आले. दरम्यान, संशोधक विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी व संशोधन कार्याला चालना देण्यासाठी विद्यापीठाच्या एकूण अंदाजपत्रकात सर्वाधिक २ कोटी ८५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, तर एकूण बजेटमध्ये ५३८.२९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या शुक्रवारी झालेल्या अधिसभेत या अंदाजपत्रकावर चर्चा करण्यात आली.

शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने २ कोटी ८५ लाख रुपयांची तरतूद केली आहे, तर संशोधन कार्यास चालना देण्यासाठी नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी रु. २५ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थिनी



वसतिगृहासाठी एकूण रु. २.५४ कोटी, तर विद्यार्थी वसतिगृहासाठी २.६७ कोटी तरतूद करण्यात आली असून, त्यामध्ये वसतिगृह दुरुस्ती, मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चाचा समावेश आहे. सध्या विद्यापीठात ४० परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांच्या सोयी-सुविधेसाठी ४७ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. रिसर्च स्कॉलर होस्टेल पूर्णत्वाकडे आले असून, प्रलंबित कामासाठी ६५ लाखांची तरतूद आहे. विद्यापीठाच्या वतीने विविध स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरे यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारासाठी दहा लाखांची मदत देण्याचा प्रस्ताव अंदाजपत्रकात आहे. शिवाजी विद्यापीठ मेरिट स्कॉलरशिपसाठी ६० लाख रुपये नियोजित ठेवण्यात आले आहेत. विविध उपकरणे खरेदीसाठी ५ कोटी ८६ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसरातील रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून रु. दीड कोटी, तसेच नवीन रस्ते तयार करण्यासाठी संशोधन व विकास निधीतून ७५ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ४२ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ परिसर सुशोभीकरणासाठी ४० लाखांचा प्रस्ताव मांडण्यात आला असून, नवीन रेकॉर्ड रूम बांधण्यासाठी ५० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. ३ कोटींची नवीन सौर यंत्रणा प्रस्तावित आहे. विद्यार्थी कल्याण व युवा वसतिगृह बांधण्याचे प्रस्तावित असून, त्यासाठी २ कोटी निधीची तरतूद आहे.

### विभागनिहाय असे आहे अंदाजपत्रक

प्रशासकीय विभाग- रु. ५८.४० कोटी, शास्त्र अधिविभाग रु. ७.५९ कोटी, इतर अधिविभाग- रु. ६.२६ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम रु.४७.७३ कोटी असा विद्यापीठाच्या स्वनिधीमधील रु. ११९.९८ कोटी खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च रु. १३२.८ कोटी, तर विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी रु. ६.१३ कोटी, तसेच संशोधन व विकास निधी रु.३२.१० कोटी व घसारा निधी रु.१२.१ कोटी, निलंबन लेखे रु. २३५.९९ कोटी अशी एकूण रु. ५३८.२९ कोटी खर्चासाठी तरतूद प्रस्तावित आहे.



## 'अभाविप'चा अधिसभा बैठकीत गोंधळ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिसभेच्या येत्या २०२३-२४ या वर्षाच्या बजेटसंदर्भात चालू असलेल्या बैठकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी सभा उधळून लावत विद्यापीठ प्रशासनाचा निषेध केला. यावेळी विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी सिनेट सभागृहात घुसून जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आत्महत्याग्रस्त प्राध्यापकांच्या कुटुंबास योग्य ती आर्थिक मदत विद्यापीठाने करावी, विद्यापीठातील तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना कायम करून घेण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करावा, तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करावी, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका येत्या शैक्षणिक वर्षासाठी घेणार असल्याचे विद्यापीठाने जाहीर करावे, विद्यापीठातील सर्व प्रभारी पद्धतीने भरण्यात आलेली पदे लवकरात लवकर कायमस्वरूपात भरावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

या मागण्यांची दखल घेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यार्थी परिषदेच्या शिष्टमंडळास १६ मार्चला दुपारी ३ वाजता भेटण्याची वेळ दिली. यावेळी प्रदेश सहमंत्री अमोघ कुलकर्णी, दिग्विजय गरड, दिनेश हुमनाबदे, रोहन कडोले, सूरज मालगावे, प्रवीण डिगेकर, जय पाटील, पराग कुलकर्णी, गणेश डुबल व कार्यकर्ते उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
11 MAR 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दंड, मानधनावरील चर्चेत संपला प्रश्नोत्तराचा तास

## तक्रार निवारण समितीकडे ६१ प्रकरणे प्रलंबित

कोल्हापूर, ता. १० : एम. फिल., पीएच.डी. मार्गदर्शकांचे मानधन, ऑनलाईन परीक्षेतील परीक्षार्थी विद्यार्थ्यांवरील दंडात्मक कारवाई, तक्रार निवारण समितीकडील प्रलंबित ६१ प्रकरणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती या मुद्द्यांवर शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटमध्ये चर्चा रंगली. १५ पैकी केवळ ४ प्रश्नांवरील चर्चेत प्रश्नोत्तराचा तास संपला. बैठकीच्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित, तर सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

प्रश्नोत्तराच्या तासात सिनेट सदस्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी तक्रार निवारण समितीकडे किती प्रकरणे प्रलंबित असल्याची विचारणा केली. त्यावर प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी ६१ प्रकरणे असून त्यावर कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले. डॉ. कुंभार यांनी संशोधन मार्गदर्शकांचे मानधन, ऑनलाईन परीक्षांमधील परीक्षार्थींवरील दंडात्मक कारवाई, तर डॉ. शिवाजी बोथीकर यांनी प्रशासकीय कर्मचाऱ्यांची मंजूर पदे, नियमित स्वरूपात भरलेली पदे याबाबतचे प्रश्न मांडले. त्यावर श्रीनिवास गायकवाड, श्वेता परूळेकर, अमित कुलकर्णी, डी. एन. पाटील आदींना उपप्रश्न मांडले. त्यावर डॉ. व्ही. एम. पाटील, आर. व्ही. शेजवळ, बबन सातपुते यांनी दिलेल्या उत्तरांवरून जोरदार चर्चा रंगली. अभिषेक मिठारी यांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव कुलगुरू डॉ. शिर्के यांनी फेटाळला. प्रश्नोत्तराच्या तास संपल्यानंतर विविध ७६ ठरावांबाबतची कार्यवाही सुरू झाली.

### ६६ पैकी अवघे ४ ठराव मंजूर

■ सिनेटची बैठक रात्री १० वाजता संपली. या बैठकीमध्ये एकूण ६६ ठराव मांडण्यात आले. त्यापैकी ६२ ठराव मागे घेण्यात आले, तर ४ ठराव मंजूर करण्यात आले. सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखा परीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मंजूर करण्यात आला. सन २०२१-२२साठीचा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आणि विद्यार्थी विकास मंडळाचा अहवालही मंजूर करण्यात आला.

11 MAR 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणासह संशोधनाला चालना

**शिवाजी विद्यापीठाचे ५३९.२९ कोटीचे बजेट: ५.३० कोटीची तूट : दीड तासाच्या चर्चेनंतर एकमताने बजेट मंजूर : संशोधनासाठी २.२५ कोटींची तरतूद**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे ५३८.२९ कोटीचे बजेट सादर करण्यात आले. यात अपेक्षित जमा ५३२.९९ कोटी असले तरी ५.३० कोटी रुपयांची अंदाजपत्रकीय तूट विद्यापीठाच्या निधीतील शिलकीतून भरून काढली जाणार आहे. हे बजेट अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी सादर केले. या अर्थसंकल्पात शैक्षणिक व संशोधनावर भरीव तरतूद केली आहे. सर्वसमावेशक अर्थसंकल्प असल्याने अधिसभा सदस्यांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत करीत दीड तास विविध प्रश्नांवर चर्चा करून अखेर एकमताने मंजूर करण्यात आले. अधिसभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

डॉ. रघुनाथ ढमकले यांनी ऑनलाईन पध्दतीने मुद्देसूदपणे वार्षिक अर्थसंकल्पाचे



सादरीकरण केले. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन आणि ग्राफिक्सच्या माध्यमातून अर्थसंकल्प मांडल्याने अधिसभा सदस्यांनी स्वागत केले. अतिशय चांगल्या पध्दतीने सादरीकरण आणि भरीव तरतूद केल्याच्या मुद्यांवर अधिसभा सदस्यांनी टाळ्या वाजवून स्वागत व अभिनंदन केले. तसेच संजय परमाने, अभिषेक मिठारी, मनोज गुजर, डी. एन. पाटील, विष्णू खाडे, जी. बी. दीक्षित, श्वेता परूळेकर यांनी अर्थसंकल्पातील त्रुटींवर बोट ठेवले. तसेच जमा होणारा पैसा आणि सादर करण्यात आलेल्या बजेटमध्ये तफावत असल्याचे दाखवून दिले. बजेटमधील तरतुदींवर चर्चा करून बजेट एकमताने मंजूर केले. बजेटमध्ये शैक्षणिक व संशोधनासाठी २.८५ कोटीची तरतूद केली. विद्यार्थिनी वसतिगृहासाठी २.५४ कोटी, विद्यार्थी वसतिगृह २.६७ कोटी, कमवा व शिका दैनंदिन खर्च ३८ लाख, ४० परदेशी विद्यार्थ्यांना पुरवण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांसाठी ४७ लाख रूपये, रिसर्च स्कॉलर हॉस्टेलसाठी ६५ लाख, स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी १० लाख रुपये, मेरिट स्कॉलरशिप ६० लाख, दिव्यांगांच्या सुविधा २.२५ कोटी, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी १ कोटी, संशोधनाला चालना २.२५ कोटी, उपकरणे खरेदी ५.८६ कोटी, रस्ते दुरूस्तीसाठी घसारा निधी १.५० कोटी, संशोधन विकास निधी ७५ लाख, संरक्षण भिंती ५० लाख, सुशोभिकरण ४० लाख, नवीन रेकॉर्ड रूमसाठी ५० लाख, प्रस्तावित संशोधन केंद्र २५ लाख, इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स १ कोटी, मानव्यशास्त्र इमारतीत ॲकॅडमीक कॉम्प्लेक्स २५ लाख, नवीन सौर यंत्रणांसाठी ३ कोटी, वाणिज्य व व्यवस्थापन इमारतीसाठी २ कोटी, म्युझियम कॉम्प्लेक्ससाठी ८५ लाख, विद्यार्थी कल्याण व युवा वसतिगृह इमारतीसाठी २ कोटी, वसतिगृह फायर सेफ्टीसाठी ५० लाख, क्रीडा विभाग होस्टेलसाठी २ कोटी, संगणकशास्त्र इमारतीसाठी १ कोटी अशा बजेटमध्ये तरतुदी केल्या आहेत.

### नव्याने केलेल्या तरतुदी

कुस्ती संकुलासाठी ५० लाख, प्रशासन आणि पुरस्कार प्रोत्साहन ५ लाख, हेल्थ केअर ॲटोमॅटीक सॉफ्टवेअर १० लाख, कम्युनिकेशन स्किल शॉर्ट टर्म सेमिनार १० लाख, पोस्ट डॉक्टरेट फेलोशिप ४० लाख, फुटबॉल तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज मैदान १० लाख या नव्याने बजेटमध्ये तरतुदी केल्या आहेत.

### अपेक्षित जमा खर्च

इतर उपक्रमातून २५.२८ कोटी, ६९.७४ कोटी स्वनिधीतून तर वेतन अनुदानापोटी शासनाकडून १२५.३० कोटी व वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी १८.३७ कोटी. संशोधनाला चालना देण्यासाठी २.२५ कोटी, विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३२.१० कोटी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १२.०१ कोटी रक्कम जमेकरिता प्रस्तावित आहे. निलंबन लेख्यांमधून २.७५.४७ कोटी अशी ५३२.९९ कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

### खर्चासाठी केलेली तरतूद

प्रशासकीय विभाग ५८.४० कोटी, शास्त्र अधिविभाग ७.५९ कोटी, इतर अधिविभाग ६.२६ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ४७.७३ कोटी, विद्यापीठाच्या स्वनिधीतून ११९.९८ कोटी खर्च करणे अपेक्षित आहे. वेतन अनुदान १३२.०८ कोटी, संस्थांकडून मिळणाऱ्या निधीतून खर्च ६.१३ कोटी, संशोधन व विकास निधी ३२.१० कोटी व घसारा निधी १२.०१ निलंबन लेखे २३५ कोटी व ९९ कोटी अशी एकूण ५३८.२९ कोटीची खर्चासाठी तरतूद प्रस्तावित केली आहे.